CMYK

५ आडतदारांनी थकविले २३५ टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांचे २ कोटी ३० लाख >>पान 2

जनावरांसाठी मका कापत असतांना बिबट्याचा शेतकऱ्यासह मुलावर हल्ला >>पान 3

अल्पवयीन मुलीवर अत्याचार आणि हत्या प्रकरण; मुख्य आरोपीला शेगावातून अटक >>पान 4

**सुविचार**

वाचन हे ज्ञानाच्या सागराचे द्वार आहे.


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034




सैफ अली खान-दीपिका पादुकोणच्या जागी शाहिद कपूर आणि क्रिती सेनॉन, १२ वर्षांनंतर बनणार चित्रपटाचा सिक्वेल

आतील पान

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 135 ■ गुरूवार, दि. 26 डिसेंबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006

## दिवंगत अटल बिहारी वाजपेयी यांना राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांचे अभिवादन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भारताचे माजी प्रधानमंत्री दिवंगत भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी आज (दि. २५) राजभवन येथे अटल बिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन केले. यावेळी राज्यपालांचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, राज्यपालांचे परिवार प्रबंधक जितेंद्र वाघ, राजभवनातील अधिकारी व कर्मचारी तसेच राजभवन येथे तैनात असलेले पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

## माजी प्रधानमंत्री भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आदरांजली

दैनिक आपला विदर्भ

**नागपूर/प्रतिनिधी :** दिवंगत माजी प्रधानमंत्री भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज रामगिरी, नागपूर येथील शासकीय निवासस्थानी अटलबिहारी वाजपेयी यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली.

### राज्यात २७-२८ डिसेंबरदरम्यान

# गारपीट आणि मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज

## खानदेश, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भातील शेतकऱ्यांनी हवामानाच्या अंदाजाची दखल घेऊन शेतीचे नियोजन करण्याचे कृषी विभागाचे आवाहन

दैनिक आपला विदर्भ



**मुंबई/प्रतिनिधी :** २७-२८ डिसेंबरदरम्यान मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात गारपीट आणि मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

२७ डिसेंबरला दुपारपासून मेघगर्जनेसह पावसाची सुरुवात सर्वात प्रथम नंदुरबार, धुळे, जळगाव, अहिल्यानगर जिल्ह्यांसह, दक्षिण मराठवाडा, पुणे आणि नाशिक जिल्ह्यांतील पूर्व भागांमध्ये होईल. शुक्रवार रात्रीपर्यंत वादळी पाऊस पश्‍चिम विदर्भ आणि शेजारच्या मराठवाड्यात हजेरी लावेल, ज्यात बुलढाणा, अकोला, वाशीम, अमरावती, छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली आणि बीड जिल्ह्यांचा समावेश आहे. या भागांमध्ये काही प्रमाणात गारपिटीची शक्यता देखील वर्तविण्यात आली आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्याच्या उर्वरित जिल्ह्यांतील काही भागांमध्ये मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता देखील आहे.

२८ डिसेंबरच्या पहाटेपर्यंत वादळी पाऊस पूर्वेकडे सरकेल आणि विदर्भातील इतर जिल्ह्यांत हजेरी लावेल. यात यवतमाळ, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, आणि चंद्रपूर जिल्ह्यांचा समावेश आहे. या भागांमध्ये काही प्रमाणात गारपीट होण्याची शक्यता आहे. पश्‍चिम विदर्भ आणि शेजारच्या मराठवाड्यातील काही भागांमध्ये पावसाची स्थिती या दिवशी देखील कायम राहण्याची शक्यता आहे. या दिवशी एकंदरीत विदर्भात आणि मराठवाड्यात आभाळी हवामान अपेक्षित असल्यामुळे कमाल तापमानात थोडी घट होईल. मात्र खानदेश आणि मध्य महाराष्ट्रात हवामान स्थिर होण्यास सुरुवात होईल. २९ डिसेंबरला विदर्भ आणि मराठवाड्यातील काही तुरळक ठिकाण वगळता राज्यातील बहुतांश भागांत स्थिर हवामान पहिला मिळेल, आणि ३० डिसेंबरपासून थंडीत वाढ होईल. शेतकऱ्यांनी हवामानाच्या या स्थितीनुसार नियोजन करावे, असे आवाहन करण्यात येत आहे. प्राण्यांना आणि काढणी केलेल्या पिकांना पाऊस, गारपीट आणि वाऱ्यापासून सुरक्षित ठेवावे. वादळ आल्यास झाडांखाली, मोकळ्या जागेत, टिनाच्या शेडखाली, वीजप्रवाह असलेल्या तारांखाली किंवा विद्युत रोहित्रांनजीक आसरा घेऊ नये, असे आवाहन देखील कृषी विभागाच्या वतीने करण्यात येत आहे.

## राज्यपालांच्या हस्ते 'मोहम्मद रफी' पुरस्काराचे वितरण

### संगीत माणसाला जोडण्याचे काम करते : राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन





दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते मंगळवारी (दि. २४) वांद्रे येथील रंगशारदा सभागृहात आयोजित कार्यक्रमात १९ व्या 'मोहम्मद रफी' पुरस्काराचे वितरण करण्यात आले. 'स्पंदन आर्ट' संस्थेतर्फे 'मोहम्मद रफी' पुरस्काराचे वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. संगीत ही कला जात, धर्म, पंथ, भाषा या पलिकडे जाऊन माणसाला जोडण्याचे काम करते, असे प्रतिपादन राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी यावेळी केले.

चित्रपट सृष्टीमधील आघाडीच्या व सर्वात लोकप्रिय गीतकारांपैकी एक असलेल्या मजरुह सुलतानपुरी यांना या वर्षीचा 'मोहम्मद रफी जीवनगौरव पुरस्कार' (मरणोत्तर) तसेच हिंदीसह बंगाली, कन्नड, मल्याळम, मराठी, ओडिया, तामिळ, तेलगू, उर्दू अशा विविध प्रादेशिक भाषांमध्ये पार्श्र्वगायन करणाऱ्या जावेद अली यांना 'मोहम्मद रफी पुरस्कार २०२४' ने राज्यपाल श्री. राधाकृष्णन यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

मजरुह सुलतानपुरी यांचा जीवनगौरव पुरस्कार त्यांचे पुत्र अंदलिब मजरुह सुलतानपुरी यांनी स्वीकारला. एक लाख रुपये व स्मृतीचिन्ह असे जीवनगौरव पुरस्काराचे स्वरूप असून, ५१ हजार रुपये व स्मृतीचिन्ह असे 'मोहम्मद रफी पुरस्कारा'चे स्वरूप आहे. याकार्यक्रमाला माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री ड. आशिष शेलार, ड. प्रतिमा शेलार तसेच मोहम्मद रफी, मजरुह सुलतान पुरी व जावेद अली यांचे कुटुंबीय व संगीत प्रेमी उपस्थित होते. यावेळी 'फिर रफी' या बहारदार मैफिलीत प्रसिद्ध गायक श्रीकांत नारायण यांनी मोहम्मह रफी यांची अजरामर गाणी सादर केली.

## मला टार्गेट करण्यासाठी नागपूरला बदनाम करु नका; देवेंद्र फडणवीसांचे विरोधकांना खडे बोल

**नागपूर/प्रतिनिधी :** मी मुख्यमंत्री झाल्यावर गुन्ह्यांच्या सर्व घटना नागपुरताच घडतात, असे सांगण्याचा प्रयत्न विरोधकांचा असतो. मात्र नागपूरात सुरक्षेचा लोकांचा परसेप्शन काय आहे हेही विरोधकांनी समजून घेतलं पाहिजे. त्यामुळे माझी विरोधकांना विनंती राहील की त्यांनी नागपूरला बदनाम करू नये. नागपूर पोलिसांना ही माझा सांगणं असेल की प्रत्येक गंभीर गुन्ह्याबद्दल ठोस कारवाई केली पाहिजे. अशा सूचना देत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विरोधकांना खडे बोल सुनावले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नागपूरातील प्रेस क्लब मध्ये आयोजित मीट द प्रेस कार्यक्रमाला उपस्थित झाले होते. देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री झाल्यानंतर पहिल्यांदाच नागपूर प्रेस क्लब आयोजित केलेल्या कार्यक्रमात उपस्थीत झाले होते. यावेळी त्यांनी विविध मुद्यांवर भाष्य केलंय.

महाराष्ट्राच्या कुठल्याच भागावर मी अन्याय होऊ दिला नाही

मी पहिल्यांदा राज्याचा मुख्यमंत्री झालो तेव्हा अनेकांच्या मनात शंका होत्या. हा मंत्रीही नव्हता, नवखा आहे, मग कारभार कसा करणार, असा प्रश्न अनेकांना पडला होता. पश्‍चिम महाराष्ट्रातील लोकांना वाटायचं, सातत्याने विदर्भावरील अन्यायावर बोलणारा व्यक्ती मुख्यमंत्रिपदी बसला की आपल्यावर अन्याय केला. पण पहिल्या पाच वर्षात लोकांच्या लक्षात आले की, आपण विदर्भात खूप काम केले आहे. >>पान २

## बीडची गुंडागर्दी...जिल्ह्यात ड्रायव्हिंग लायसन्स दिल्यासारखे बंदुक परवाने

### १२८१ अधिकृत पिस्तुल; खासदारांचा संताप

दैनिक आपला विदर्भ



**बीड/प्रतिनिधी :** बीडच्या मस्साजोगमधील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणावरून वातावरण दिवसेंदिवस तापतच चाललंय. अशातच देशमुख यांच्या हत्या प्रकरणानंतर बीड जिल्ह्यात देण्यात आलेल्या शस्त्र परवान्याचा मुद्दा समोर आलाय. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी ट्विट करत हे सर्व प्रकरण समोर आणले आहे. एकट्या बीड जिल्ह्यात एक हजाराहून अधिक परवानाधारक पिस्टल आहेत.

बीड जिल्ह्यात सरपंच संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर कायदा व सुव्यवस्थेबाबत अनेक प्रश्न उपस्थित केले जात आहे. या घटनेनंतर बीडचा बिहार होतोय का? असं देखील सर्व स्तरातून बोलले जातंय. देशमुख यांच्या प्रकरणानंतर बीड जिल्ह्यात सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी मंत्री धनंजय मुंडे यांचे कार्यकर्ते कैलास फड यांचा हवेत गोळीबार करताना व्हिडिओ ट्विट केला. आणि शस्त्र परवाना बाबत प्रश्न उपस्थित केले आहेत.

बीड जिल्ह्यात १ हजार २८१ पिस्तूल परवाने, तर २९५ अर्ज फेटाळले

बीड जिल्ह्यात एक हजार २८१ पिस्तूल परवाने आहेत. तर २९५ जणांचे अर्ज फिटाळण्यात आले आहे. जिल्हाभरातून आलेल्या अर्जातून एकट्या परळी तालुक्यात ५५ अर्ज फेटाळले गेलेत. दरम्यान पिस्तूल परवान्यासाठी कोणत्याही शिफारशीची गरज लागत नसून त्यासाठी अनेक नियमावली असल्याचं बीडमधील पिस्तूल परवानाधारक पत्रकार भागवत तावरे यांनी सांगितले आहे.

सरपंच देशमुख हत्या प्रकरणानंतर विरोधकांसह सत्ताधाऱ्यांकडून देखील या प्रकरणाची चौकशी करून सूत्रधाराला अटक करण्याची मागणी केली जातेय. आज बजरंग सोनवणे यांनी पत्रकार परिषद घेऊन जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न बीड जिल्ह्यात किती गंभीर आहे. याबाबत भाष्य केले. तर यातील मास्टरमाइंडचा शोध घेतला नाही तर मात्र २८ तारखेच्या मोर्चानंतर स्वत: बजरंग सोनवणे उपोषणाला बसणार आहेत.

# जनसामान्यांच्या विश्वासाला जीवापाड जपेन - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या जन्मशताब्दी समारंभात मुख्यमंत्र्यांचा सत्कार

दैनिक आपला विदर्भ






**नागपूर/प्रतिनिधी :** आजवर अनेक चढ-उतार राजकारणात अनुभवावे लागले. मला राजकारणात यायचे नाही हा सुरुवातीला माझा मनोदय होता. तथापि लोकसेवेचे ते एक माध्यम आहे हे माझ्या वरिष्ठांनी बिंबवून मला नगरसेवक पदाच्या निवडणुकीत उतरविले. कार्यकर्त्यांच्या बळावर मी निवडून आलो. महापौर झालो. आमदार झालो. मुख्यमंत्री म्हणून काम पाहिले. पुन्हा निवडून आलो. बहुमत असतांनाही राजकीय गणितांच्या गोळा बेरिजेमध्ये निराशा घ्यावी लागली. मला प्रत्येक क्षणी श्रद्ध्येय अटल बिहारी वाजपेयी यांचे हार नही मानुंगा हे शब्द प्रेरणा देत राहिले. आज पुन्हा कार्यकर्त्यांनी जी उत्स्फूर्त मेहनत घेतली, महाराष्ट्रातील मतदारांनी जो प्रचंड विश्वास दिला त्या विश्वासाच्या बळावर आज मला मुख्यमंत्री होता आले याची जाणीव असून एक सामान्य कार्यकर्ता म्हणून या विश्र्वासाला जीवापाड जपेन, असे भावोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सत्काराला उत्तर देतांना काढले.

भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी यांच्या जन्मशताब्दी वर्षाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या सत्कार समारोहात ते बोलत होते. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारोहास महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, कामगार मंत्री आकाश फुंडकर, राज्यमंत्री पंकज भोयर व विदर्भातील सन्माननिय आमदार उपस्थित होते.

आजवर नम्रतेने मी सत्कार टाळत आलो. मला नगरसेवक झाल्याची घटना आजही तेवढीच ताजी व कालच घडल्या सारखी वाटते. राज्यातील सर्व कार्यकर्त्यांनी स्वत:च्या रुपात मला पाहिले याचे नेहमी कौतुक वाटत आले आहे. यशाच्या पाठीमागे जनतेने टाकलेला विश्र्वास मला खुप मोलाचा वाटतो. या राज्यातील सर्व जनतेचा हा सत्कार आहे ही माझी भावना असून समाजातील प्रत्येक घटकाने दिलेला विश्वास सार्थकी लावेल असे त्यांनी स्पष्ट प्रतिपादन केले. हे यश राज्यातील सर्व कार्यकर्त्यांसह उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतलेल्या परिश्रमामुळे असून मुख्यमंत्र्यांनी त्यांच्याप्रति कृतज्ञता व्यक्त केली.

## स्वकर्तृत्वावर देवेंद्र फडणवीस यांनी विश्वासाला सार्थ केले - केंद्रीय मंत्री नितीन गडकरी

कोणत्याही सत्कारात भविष्यातील अपेक्षा दडलेल्या असतात. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घराण्याच्या जोरावर नव्हे तर त्यांच्यावर सोपविलेल्या जबाबदारीमुळे ते राजकारणात आले. आपल्या कर्तृत्वाच्या बळावर त्यांनी प्रत्येक वेळी दिलेली जबाबदारी सार्थकी लावली या शब्दात केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी फडणवीस यांच्या बद्दल गौरवोद्गार काढले.



अशांतता ही प्रगतिला मोठी अडसर असते. जगात एका बाजुला युक्रेन, इस्त्राईलसारखे देश युध्दामुळे अस्वस्थ आहेत. स्वाभाविकच ही अशांतता प्रगतीला खिळ घालणारी आहे, असे स्पष्ट करुन भारतातील धर्मनिरपेक्षतेला त्यांनी अधोरेखित करुन प्रत्येक विचारधारेला सन्मानाचे बळ देऊन त्यातील निरपेक्ष एकात्मता साधली पाहिजे असे आवाहन केले. आज भगवान गौतम बुध्द, प्रभू राम, कृष्ण, अल्लाह, येशू ही एकच रुपे असून आमच्या नजरेत ती वेगळी नाहीत. अटलजींची धर्मनिरपेक्षता ही या व्यापक दृष्टीकोनातून आहे. या राज्यातील गोरगरिब, दिन-दुबळे, मागासवर्गीय, अल्पसंख्यांक, शेतकरी, कष्टकरी, कामगार या सर्वांनी विकासाच्या प्रवाहात आणण्याची जबाबदारी आपल्यावर असून त्यासाठी आपण सर्व कटिबध्द होऊ या असे गडकरी म्हणाले. हे राज्य फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारधारेला वाहते करणारे असून महाराष्ट्र सर्वांना सुसह्य कसा होईल याला प्राधान्य देऊ असे त्यांनी सांगितले. यावेळी महसूल मंत्री चंदशेखर बावनकुळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

CMYK

# ५ आडतदारांनी थकविले २३५ टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांचे २ कोटी ३० लाख

दैनिक आपला विदर्भ



**नाशिक /प्रतिनिधी :** पिंपळगाव कृषी उत्पन्न बाजार समितीत या वर्षीचा टोमॅटो हंगाम संपला असून ५ टोमॅटो आडतदारांनी २३५ शेतकऱ्यांचे सुमारे दोन कोटी ३० लाख रुपये थकविल्याने उत्पादक शेतकऱ्यांनी समितीच्या कार्यालयात ठिय्या मांडत हे पैसे न मिळाल्यास आंदोलनाचा इशारा दिला आहे. पिंपळगाव कृषी उत्पन्न बाजार समिती ही शेतकऱ्यांना त्यांच्या लिलावात विक्री मालाचे पैसे २४ तासांत देण्यासाठी प्रसिद्ध असल्याने या आवारात निफाड, चांदवड, दिंडोरी, सटाणा, सिन्नर या तालुक्यातून शेतकरी कृषिमाल विक्रीस आणतात. मात्र यावर्षी निफाड, चांदवड, दिंडोरी येथील टोमॅटो उत्पादकांचे पैसे थकले आहेत.

समितीतील पाच कंपन्यांमधील आडतदारांनी तीन तालुक्यातील २३५ टोमॅटो उत्पादक शेतकऱ्यांना चार महिन्यांपासून त्यांच्या पिकाचे सुमारे दोन कोटी ३० लाख रुपये अदा केलेले नाहीत. त्यांना उडवाउडवीची उत्तरे मिळत असल्याने अखेर सर्व शेतकऱ्यांनी बाजार समितीच्या कार्यालयात येऊन सभापती दिलीप बनकर व संचालक मंडळासमोर आपली व्यथा मांडत हे पैसे न मिळाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

## सामाजिक परिस्थितीवर भाष्य करणारा महान दिग्दर्शक

हिंदी चित्रपट सष्टीतील ज्येष्ठ दिग्दर्शक, पटकथाकार श्याम बेनेगल यांचे नुकतेच वयाच्या ९० व्या वर्षी वृद्धापकाळाने निधन झाले. १४ डिसेंबर १९३४ रोजी हैद्राबाद येथ त्रिमुलागिरी येथे जन्मलेले श्याम बेनेगल हे हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रतिथयश दिग्दर्शक होते. त्यांचे पूर्ण नाव श्यामसुंदर श्रीधर बेनेगल असे होते. श्याम बेनेगल यांना लहानपापासूनच चित्रपटाचे वेड होते. उस्मानिया विद्यापीठातून अर्थशास्त्र विषयात मास्टर ऑफ आर्टसची पदवी मिळवल्यानंतर त्यांनी मुंबईतील एका कंपनीत जाहिरात कॉपीराईटर म्हणून काम केले. यावेळी त्यांनी जाहिराती, लघुपट बनवताना चित्रपट निर्मितीच्या तांत्रिक गोष्टींचा अनुभव घेतला हाच अनुभव त्यांना पुढील काळात उपयोगी ठरला. सुरुवातीला त्यांनी काही लघुपटाची निर्मिती केली. १९७४ साली त्यांनी अंकुर हा पहिला चित्रपट दिग्दर्शित केला. अंकुर चित्रपटात त्यांनी भारतातील जातीव्यवस्था, वर्ग वर्चस्व, स्त्री पुरुष भेदाभेद यांचे चित्रण केले. हा चित्रपट तिकीट बारीवर तर यशस्वी ठरलाच पण या चित्रपटाची जागतिक स्तरावर दखल घेण्यात आली. या पुरस्काराला राष्ट्रीय पुरस्कार देखील मिळाला. पहिल्याच चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याने श्याम बेनेगल यांची जगभर चर्चा होऊ लागली. अंकुर नंतर त्यांनी निशांत आणि मंथन या दोन चित्रपटांचे दिग्दर्शन केले. ग्रामीण भागातील वास्तववादी चित्रण या चित्रपटातून त्यांनी केले. स्मिता पाटील, अमरीश पुरी, नसरुद्दीन शहा, ओम पुरी, शबाना आझमी, अन्नू कपूर, कुलभूषण खरबंदा यासारखे दिग्गज आणि महान कलाकार श्याम बेनेगल यांच्यामुळेच चित्रपट सृष्टीला लाभले. श्याम बेनेगल यांनीच या कलाकारांना पहिल्यांदा संधी दिली. करणदास चोर, भूमिका, जूनून, कलयुग, आरोहण, मंडी, त्रिकाल, अंतर्नाद, सूरज का सातवा घोडा, मम्मो, सरदारी बेगम, द मेकिंग ऑफ महात्मा, समर, जुबेदा, हरिभरी, नेताजी सुभाषचंद्र बोस हे त्यांनी दिग्दर्शित केलेले चित्रपट प्रेक्षकांना भावले. हे सर्व चित्रपट वेगळ्या धाटणीचे होते. या सर्व चित्रपटात त्यांनी तत्कालीन सामाजिक परिस्थितीवर भाष्य केले. हिंदी चित्रपट सृष्टीत समांतर चित्रपटाची चळवळ श्याम बेनेगल यांनी सुरू केली. व्यवसायिक चित्रपटात दाखवण्यात येणारा धांगडधिंगा त्यांच्या चित्रपटात नव्हता म्हणूनच चित्रपटात कोणताही धांगडधिंगा न दाखवता तत्कालीन सामाजिक परिस्थितीवर भाष्य करणारा चित्रपट दिग्दर्शक अशी त्यांची ओळख बनली. त्यांनी चित्रपटातून मांडलेले मुद्दे, कथा प्रेक्षकांना विचार करायला लावणारे असायचे. त्यांनी दिगदर्शित केलेल्या अंकुर नावाच्या चित्रपटाची तर जगाला दखल घ्यावी लागली. त्यांनी दिग्दर्शित केलेले सर्वच चित्रपट प्रेक्षकांना भावले. त्यांचे सर्व चित्रपट सर्वसामान्य जनतेच्या आयुष्यातील संघर्षावर भाष्य करणारे असायचे म्हणून प्रेक्षकांनी त्यांच्या चित्रपटांना पसंती दिली. त्यांनी दूरदर्शनवरील काही मालिकांचे देखील दिग्दर्शन केले. पंडित जवाहलाल नेहरू यांच्या डिस्कवरी ऑफ इंडिया या पुस्तकावर आधारित भारत एक खोज ही ५३ भागांची मालिका त्यांनी दूरदर्शनवर दिग्दर्शित केली. उच्च निर्मितीमूल्य असलेली ही मालिका त्या काळात बरीच लोकप्रिय ठरली. अमरावती की कथाये, कथा सागर, संविधान या त्यांनी दिग्दर्शित केलेल्या मालिका देखील प्रेक्षकांना भावल्या. श्याम बेनेगल यांना अनेक पुरस्कार मिळाले. चित्रपट सृष्टीतील सर्वोच्च समजला जाणारा दादासाहेब फाळके हा मानाचा पुरस्कार त्यांना २००५ साली देण्यात आला. भारत सरकारनेही त्यांना पद्मश्री आणि पद्मभूषण हे मानाचे पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. त्यांच्या निधनाने हिंदी चित्रपट सृष्टीचे मोठे नुकसान झाले आहे. सामाजिक मुद्द्यांवर चित्रपटाच्या माध्यमातून प्रभावी भाष्य करणारा त्यांचा सारखा दिग्दर्शक पुन्हा होणार नाही. त्यांच्या निधनाने सर्वसामान्यांचा संघर्ष, त्यांचे प्रश्न चित्रपटातून मांडणारा एक महान दिग्दर्शक काळाच्या पडद्याआड गेला आहे. त्यांच्या निधनाने हिंदी चित्रपट सृष्टीचे कधीही भरून न निघणारे नुकसान झाले आहे. महान दिग्दर्शक श्याम बेनेगल यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

## सैफ अली खान-दीपिका पादुकोणच्या जागी शाहिद कपूर आणि क्रिती सेनॉन, १२ वर्षांनंतर बनणार चित्रपटाचा सिक्वेल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** दीपिका पादुकोण आणि सैफ अली खानचा 'कॉकटेल' चित्रपट आठवा, ज्यामध्ये डायना पेंटी देखील दिसली होती. या चित्रपटात तिघांचा लव्ह ट्रँगल दाखवण्यात आला होता. या चित्रपटातील गाण्यांचीही खूप चर्चा झाली होती. आता १२ वर्षांनंतर 'कॉलटेल'चा सिक्केल बनवणार आहे. पण या चित्रपटात सैफ अली खान आणि दीपिका पादुकोण नाही, तर शाहिद कपूर आणि क्रिती सेनॉन रोमान्स करताना दिसणार आहेत. पिंकविलाच्या रिपोर्टनुसार, हा 'कॉकटेल'चा सीक्वल असणार आहे आणि तो पुन्हा होमी अदजानिया दिग्दर्शित करणार आहे. या चित्रपटात शाहिद कपूर आणि क्रिती सेनॉन 'तेरी बातों में ऐसा उल्झा जिया' नंतर पुन्हा रोमान्स करताना दिसणार आहेत.

रिपोर्ट्सवर विश्र्वास ठेवला तर 'कॉकटेल' नंतर दिनेश विजन 'कॉकटेल २' साठी सज्ज झाला आहे. मात्र, यावेळी चित्रपटात बदल पाहायला मिळणार आहेत. पण मागील चित्रपटाप्रमाणे या चित्रपटातही प्रेमाचा त्रिकोण दिसणार असून शाहीद कपूर आणि क्रिती सेनॉन मुख्य भूमिकेत दिसणार आहेत. या चित्रपटात रश्मिका मंदान्ना देखील दिसणार असल्याचे वृत्त आहे.

रिपोर्ट्सवर विश्र्वास ठेवला तर, 'तेरी बातों में ऐसा उल्झा जिया' नंतर शाहिद कपूर आणि क्रिती सेनॉन



'कॉकटेल २' मध्ये पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर एकत्र दिसण्यासाठी सज्ज आहेत. दोघांनाही चित्रपटाची स्क्रिप्ट आवडली. तथापि, अद्याप या संदर्भात निर्मात्यांनी किंवा शाहिद कपूर आणि क्रिती सेनॉनने कोणतेही अपडेट दिलेले नाही. तथापि, चित्रपट निर्माते दिनेश विजन यांना रोमकॉम जॉनर आवडतो आणि त्यांनी याआधी त्यावर अनेक चित्रपट बनवले आहेत. लव रंजन 'कॉकटेल २' लिहिणार असल्याची चर्चा आहे. लव रंजनने यापूर्वीही अनेक रोमकॉम केले आहेत.

२०१२ मध्ये 'कॉकटेल' रिलीज झाला, तेव्हा हा चित्रपट दीपिका पादुकोणसाठी गेम चेंजर ठरला. या चित्रपटानंतर तिचे करिअर गगनाला भिडले. या चित्रपटाची कथा इम्तियाज अली यांनी लिहिली होती. या चित्रपटात एक प्लेबॉय, फोटोग्राफर आणि एक रूढीवादी मुलगी यांच्यातील प्रेमाचा त्रिकोण दाखवण्यात आला होता. अहवालांवर विश्र्वास ठेवला तर, सध्या 'कॉकटेल २' साठी कास्टिंग चालू आहे आणि ते मे २०२५ मध्ये रिलीज होऊ शकते.

वर्क फ्रंटबद्दल बोलायचे झाले, तर शाहिद कपूर शेवटचा 'तेरी बातों में ऐसा उल्झा जिया' मध्ये दिसला होता. सध्या तो रोशन अँड्रयूच्या 'देवा' या चित्रपटाचे शूटिंग करत आहे. या चित्रपटात त्याच्यासोबत पूजा हेगडे आहे. क्रिती सेनॉनबद्दल बोलायचे झाले, तर ती 'क्रू'मध्ये दिसली होती. याशिवाय क्रिती सेनॉन शाहीर शेखसोबत 'दो पत्ती'मध्येही दिसली होती. अलीकडेच क्रितीने तिची बहीण नुपूर सेननसोबत काम करण्याचे संकेतही दिले होते.

पान १ वरून...

## मला टार्गेट करण्यासाठी नागपूरला बदनाम करु नका; देवेंद्र फडणवीसांचे विरोधकांना खडे बोल

महाराष्ट्राच्या कुठल्याच भागावर अन्याय होऊन दिला नाही. पश्चिम महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र, कोकण आणि मराठवाड्यात सिंचनाचे अनेक प्रकल्प पूर्ण केले. पायाभूत क्षेत्रात आपण मोठी भरारी घेतली. राज्याचा उपमुख्यमंत्री असताना आपण ऊर्जा विभागाचा २५ वर्षाचा रोडमॅप तयार केला आहे. पुढच्या दोन-तीन वर्षात अशी परिस्थिती येईल की, आपण उद्योगासहित सर्वप्रकारच्या वीजेचे दर कमी करु शकतो, अशी व्यवस्था आपण उभारली आहे, असे महत्त्वाचे वक्तव्य देवेंद्र फडणवीस यांनी केली.

विदर्भात आता मोठी औद्योगिक इकोसिस्टीम उभी राहील

याशिवाय, आपण राज्यभरात सहा नदीजोड प्रकल्पांची कामे हाती घेतली आहेत. यामुळे विदर्भातील १० लाख एकर क्षेत्र ओलिताखाली येणार आहे. त्यामुळे विदर्भाचा कायापालट होणार आहे. हे प्रकल्प अनेक पिढ्यांवर परिणाम करणारे आहेत. गडचिरोली जिल्हा नेक्स्ट स्टील सिटी ऑफ इंडिया म्हणून उदयाला आले आहे. या भागातील नक्षलवाद कमी झाला आहे. त्यामुळे आगामी काळात विदर्भात औद्योगिक इकोसिस्टीम उभी राहील, असे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

ना बीड ना नागपूर? कोणत्या जिल्ह्याचं पालकमंत्रीपद हवं?

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस पत्रकार परिषदेत बोलताना पुढे म्हणाले की, पालकमंर्त्यांच्या संदर्भात आमच्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे इतर दोन्ही पक्षांसोबत बसून कुठे कोण पालकमंत्री असेल याचा निर्णय करतील. ते जो निर्णय करतील तो मला मान्य असेल, त्यांनी मला बीडला जायला सांगितलं तर मी बीडला देखील जाईल, किंवा त्यांनी जिथे जायला सांगितलं तिथे जाईल. साधारणपणे मुख्यमंत्री कुठले पालकत्व ठेवत नसतात. पण माझी स्वत:ची इच्छा आहे, गडचिरोली मात्र मी स्वत:कडे ठेवू इच्छितो, अर्थात या तीन नेत्यांनी मान्यता दिली तरच मी ते ठेवेन, असं देवेंद्र फडणवीसांनी म्हटले आहे.

## लाडकी बहीण योजनेसाठी जीवाचे रान करणाऱ्या अंगणवाडी सेविकांचा सरकारला विसर? अद्याप परताव्यापासून वंचित

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** लाडक्या बहिणींना सरकारकडून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजने अंतर्गत डिसेंबर महिन्याचा म्हणजेच योजना सुरू झाली तेव्हापासूनचा सहावा हप्ता मिळण्यास सुरुवात झाली आहे. मात्र राज्यातील सुमारे २ कोटी ३४ लाख लाभार्थी लाडक्या बहिणींचे फॉर्म भरून घेणाऱ्या आणि महाराष्ट्र सरकारची ही योजना प्रचंड यशस्वी करणाऱ्या अंगणवाडी सेविका प्रती फॉर्म मागे मिळणाऱ्या पन्नास रुपयांपासून वंचित आहे. त्यामुळे योजनेतील लाभार्थी बहिणी सरकारला लाडक्या आहेत, मात्र योजना यशस्वी करण्यात मोलाची भूमिका बजावणाऱ्या अंगणवाडी सेविका आणि मदतनीस सरकारला परक्या आहेत का? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

अद्याप एक दमडीही मिळाली नाही

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राज्यात प्रचंड यशस्वीच झाली नाही, तर निवडणुकीच्या मैदानातही महायुतीसाठी गेमचेंजर ठरली आहे. या योजनेतील २ कोटी ३४ लाख लाभार्थींपैकी बहुतांशी महिलांनी महायुतीला भरभरून मतदान केलं, आणि त्यामुळेच महायुती सत्तेत आधीच्या तुलनेत जास्त भक्कमपणे परत आली, असच राजकीय विषण केलं जात आहे.













[illegible]

# जनावरांसाठी मका कापत असतांना बिबट्याचा शेतकऱ्यासह मुलावर हल्ला





दैनिक आपला विदर्भ

**नाशिक /प्रतिनिधी :** जनावरांच्या चाऱ्यासाठी मका कापणी करत असतांना दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक शेतकरी व मुलावर हल्ला केल्याची घटना येवला तालुक्यातील खिर्डी साठे येथे घडल्याने शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या बिबट्याच्या हल्ल्यात शेतकरी गणेश मोरे आणि बिबट्यात झटापट झाली या हल्ल्यात शेतकरी गणेश मोरे यांच्या हातापायला जखमी झाली तर बिबट्याने शेतकऱ्याचा मुलगा सजन मोरे याकडे मोर्चा वळवत हल्ला केला सजन जखमी झाला मुलाजवळ बिबट्या गेल्याने जखमी अवस्थेत असलेले शेतकरी गणेश मोरे व परिसरातील शेतकऱ्यांनी आरडाओरड करताच बिबट्याने तेथून पळ काढला दोघे जखमींवर नगरसुल येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार करत सोडून देण्यात आले या घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले असता शेतकऱ्यांनी बिबट्याला जेरबंद करण्यासाठी येवला वन विभागाच्या कर्मचाऱ्यांकडे पिंजरा लावण्याची मागणी केली असून तातडीने पिंजरा लावत बिबट्याला जेरबंद करू असे आश्र्वासन वन विभागाकडून यावेळी भयभीत झालेल्या शेतकऱ्यांना देण्यात आले.



## ऐतवडे बुद्रुक मध्ये बिबट्याचा धुमाकूळ, बिबट्याने धुमाकूळ घालून नऊ ते दहा मेंढरांचा फडशा पाडला

दैनिक आपला विदर्भ

**सांगली /प्रतिनिधी :** सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील ऐतवडे बुद्रुक येथील सौरव पाटील यांच्या शेतामध्ये गावातीलच मेंढपाळांचे मेंढरे बसायला आहेत. काल सायंकाळी सहा ते सात वाजण्याच्या दरम्यान बिबट्याने धुमाकूळ घालून नऊ ते दहा मेंढरांचा फडशा पाडला आहे. त्यामुळे मेंढपाळचे मोठे नुकसान झाले आहे. या घटनेने येथील परिसरात शेतकऱ्यांमध्ये धास्ती बसली आहे. आणि शेतकऱ्याच्यात भीतीचे वातावरण पसरले आहे. या घटनेने हळहळ व्यक्त केली जात आहे.

## महत्त्वाचे...

### श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वाराचे दार चांदीने मढविण्याचे काम सुरू



दैनिक आपला विदर्भ

**पंढरपूर /प्रतिनिधी :** श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिराचे जतन व संवर्धन करण्याचे काम सुरू असून या अंतर्गत संत नामदेव पायरीवरील पितळी दरवाजा चांदीचा बनविण्याचा ठराव मंदिर समितीच्या बैठकीमध्ये करण्यात आला होता. दरम्यान नांदेड येथील अरगुलकर परिवाराच्यावतीने सदर दरवाजास चांदी बसवून देण्यात येत आहे. यासाठी तीस किलो चांदी लागणार असून याची किंमत जवळपास तीस लाख रूपये आहे. शंकर व नरसिमलू या बंधूंनी आपले वडील स्व. दिगंबर तुकाराम अरगुलकर व आई स्व. जनाबाई यांच्या स्मरणार्थ हा दरवाजा चांदीचा केला आहे. अरगुलकर परिवार श्री विठ्ठल रूक्मिणीचे निस्सीम भक्त आहेत. त्यानुसार मागील आठ दिवसापासून सदर काम सुरू आहे. यामुळे येथून भाविकांना प्रवेश बंद ठेवण्यात आला आहे. येत्या आठ दिवसात सदर काम पूर्ण झाल्यानंतर मंदिराच्या प्रवेशद्वाराला मोठी झळाळी मिळणार आहे.

### नांदेड भाजपाकडून अटलबिहारी वाजपेयी यांची जयंती साजरी



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड /प्रतिनिधी :** देशाचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पार्टीच्या वतीने त्यांना विनम्र श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. यावेळी भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. देशाचे माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या विचारावर भारतीय जनता पार्टी चालत असून येणाऱ्या काळात देखील त्यांची प्रेरणा घेऊनच केंद्रातील व राज्य सरकार हे चांगले निर्णय घेतील असा विश्वास भारतीय जनता पार्टीच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

### इतवारा भागातील ज्वेलरीच्या दुकानाला लागली आग



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड /प्रतिनिधी :** इतवारा भागातील ज्वेलरीच्या दुकानाला आग लागून ७५ लाखांचे नुकसान झाल्याची माहिती अग्निशामक दलाच्या वतीने देण्यात आली आहे. सध्या त्या ठिकाणी आग विझवण्यात अग्निशामक दलाला यश आले आहे. चार अग्निशामक वाहनामार्फत ही आग विझवण्यात आली असून आग कशामुळे लागली ही अद्याप स्पष्ट झालेले नाही. सुदैवाने या आगीमध्ये जीवित हानी झाली नाही

## माळेगाव यात्रेचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात आले निमंत्रण



दैनिक आपला विदर्भ

**नांदेड /प्रतिनिधी :** दक्षिण भारताची काशी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या माळेगाव यात्रेला महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व दोन्ही उपमुख्यमंत्री तसेच मंत्री धनंजय मुंडे उपस्थित राहणार असल्याची माहिती माळेगाव ग्रामपंचायतचे सरपंच मल्हारी धुळगुंडे यांनी दिली. माळेगाव ग्रामपंचायतच्या वतीने त्यांना प्रत्यक्ष जाऊन निमंत्रण देण्यात आले आहे. त्यांनी येण्याचे आश्र्वासन दिले आहे. ही यात्रा २९ डिसेंबर पासून ३ जानेवारीपर्यंत चालणार आहे. यामध्ये विविध स्पर्धेचे आयोजन जिल्हा परिषद प्रशासन व जिल्हा नियोजन समिती यांच्यामार्फत करण्यात आले असून जास्तीत जास्त यात्रेकरूंनी या यात्रेमध्ये सहभागी होऊन खंडेरायाचे दर्शन घ्यावे असे आवाहन सरपंच मल्हारी धुळगंडे यांनी नागरिकांना केले आहे.


## भीमथडी जत्रेत चोरी करणारे गजाआड; ७१ हजार रुपयांची रोकड आणि पेनड्राइव्ह चोरला, इतक्या गर्दीत कसा केला तपास?

**पुणे /प्रतिनिधी :** भीमथडी जत्रेमध्ये स्टॉलधारक महिलेच्या पिशवीतून चोरट्यांनी तब्बल ७१ हजार रुपयांची रोकड आणि पेनड्राइव्ह चोरुन नेला. ही चोरी तेथील सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाली होती, तात्काळ शिवाजीनगर पोलिसांनी ४ जणांना अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातून अटक केली आहे. मनोज भगतसिंग पवार, संदीप संजय गौड, रतिलाल प्रेमलाल परमार, विकी साळुंखे अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. हा प्रकार सिंचननगर येथील भीमथडी जत्रेत रविवारी सायंकाळी पाच वाजता घडला होता.

फिर्यादी महिला यांचा भीमथडी जत्रेत महिला बचत गटाचा स्टॉल आहे. रविवारी जत्रेत मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली होती. यावेळी त्यांनी आतल्या बाजूला ठेवलेल्या बॉक्समधून चोरट्यांनी ७१ हजार रुपयांची रोकड चोरुन नेली. ही गोष्ट त्यांच्या लगेच लक्षात आली. त्यांनी पोलिसांना याची माहिती दिली. पोलिसांनी स्टॉलवरील सीसीटीव्ही तपासले आणि तांत्रिक विषण मधून पोलिसांना या तरुणांपर्यत पोहचता आलं आणि त्याला ताब्यात घेतलं.

## देशातील पहिला दिव्यांग पूरक सिग्नल ठाण्यात

दैनिक आपला विदर्भ




**ठाणे /प्रतिनिधी :** वाहनांच्या वर्दळीमुळे दिव्यांग आणि दृष्टीहिनांना रस्ता ओलांडताना अनेक अडथळ्यांचा सामना करावा लागतो. कधी कधी अन्य व्यक्तीवर अवलंबून राहावे लागते.तेव्हा, वाहतुक सुरक्षा अभियानाचे औचित्य साधून ठाणे महापालिका आणि ठाणे शहर वाहतुक शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने ठाण्यातील तीनहात नाका सिग्नलवर प्रायोगिक तत्वावर दिव्यांग पूरक (हॅंडीकॅप अक्सेसेबल) सिग्नल यंत्रणा कार्यन्वीत करण्यात येणार आहे. अशी माहिती वाहतूक उपायुक्त पंकज शिरसाट यांनी दिली.

ठाण्यात नागरीकरणासोबतच वाहनांची संख्या वाढत आहे. तीनहात नाका, नितीन कंपनी व कॅडबरी जंक्शन, कापूरबावडी – माजिवडा अशा मुख्य चौकात एकाच वेळी अनेक रस्त्यांवर वाहने येतात. या जंक्शनवर सिग्नल यंत्रणा असली तरी डोळस व्यक्तीलाही रस्ता ओलांडताना अडचणींना तोंड द्यावे लागते. तर दृष्टीहीन दिव्यांग व्यक्तींना रस्ता ओलांडताना अडचणी येतात. तेव्हा, दिव्यांग पूरक सिग्नल यंत्रणा बसवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ठाण्यातील तीनहात नाका सिग्नलवर प्रायोगिक तत्वावर दिव्यांग पूरक (हॅंडीकॅप अक्सेसेबल) सिग्नल यंत्रणा बसवली जाणार आहे. यात रेल्वेच्या दिव्यांग डब्याच्या धर्तीवर बीपर असणार असून जिथे चढ उतार असतील तिथे छोटे छोटे रॅम्प केले असून तेथील पोलवर हे बीपर असणार आहेत.

## जालना शहरातील अग्रेसन फाऊंडेशन ते बड़ी सड़क हाया हमीद चौका पर्यंतच्या सिमेंट रस्त्याच्या कामास सुरुवात




दैनिक आपला विदर्भ

**जालना /प्रतिनिधी :** जालना शहरातील अग्रेसन फाऊंडेशन ते बड़ी सड़क हाया हमीद चौक दरम्यान सिमेंट रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली आहे. २ कोटी १५ लाख रुपयांच्या रस्त्याच्या कामाचे आज आमदार अर्जुन खोतकर यांच्या हस्ते आज भूमिपूजन करण्यात आले. आमदार अर्जुन खोतकर यांच्या प्रयत्नातून जालन्यासाठी मंजूर झालेल्या ६८ कोटी रुपयांच्या विविध विकास कामांना आजपासून सुरुवात झाली आहे. यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले, निवृत्त सरकारी वकील अंबादास खर्डेकर यांच्यासह स्थानिक नागरिक पदाधिकारी कार्यकर्ते आणि जालना शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उपजिल्हा रुग्णालय चांदवड तर्फे लहान मुलांच्या शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन

दैनिक आपला विदर्भ





**नाशिक /प्रतिनिधी :** उपजिल्हा रुग्णालय चांदवड,येथे राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमांतर्गत लहान मुलांचे इतर शस्त्रक्रिया शिबिर संपन्न झाले, या शिबिरामधे एकूण १४ मुलांच्या शस्त्रक्रिया झाल्या असून. यामध्ये झहळीोळी, ढेपर्सीश ढळश यासारख्या शस्त्रक्रिया यशस्वीरित्या करण्यात आल्या.

सदर शिबिरासाठी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. चारुदत्त शिंदे, आरएमओ डॉ. सूर्यवंशी, चांदवड उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.नवनाथ आव्हाड, तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.हेमंत अहिरराव, दीपक चौधरी यांचे सहकार्य लाभले. या शिबिराकरिता सर्जन म्हणून डॉ. प्रवीण गडसिंग, भूलतज्ञ डॉ. सुजाता वाघमारे डॉ.वानखेडे,अस्थिरोग तज्ञ डॉ.पालवे यांच्या सहकार्याने शस्त्रक्रिया यशस्वीरित्या संपन्न झाल्या, तर शिबिराचे संपूर्ण नियोजन आर.बी.एस.के. नोडल अधिकारी डॉ.जीवन देशमुख,डॉ गायत्री पितृभक्त,डॉ. स्वप्निल वाळुंज,डॉ. रश्मी बैसाणे डॉ. निलेश गायकवाड डॉ. पूजा शिंदे ,डॉ.तृप्ती नंदन,डॉ.नितीन बुवा,औषध निर्माणाधिकारी ,घनश्यम आंबेकर शरद चव्हाण प्रणिता भामरे धनराज पाटील सारिका दाणी व अधिपरिचारिका छाया भारुड सुनिता दराडे यांनी केले. तसेच सदर शिबिर हे उपजिल्हा रुग्णालय चांदवड येथे यशस्वीरित्या पार पडल्याबद्दल सर्व विद्यार्थ्यांच्या पालकांनी समाधान व्यक्त करून उपजिल्हा रुग्णालय चांदवड येथील सर्व कर्मचारी व आरबीएसके पथकाचे विशेष आभार मानले.तर डॉ प्रविण गडसिंग यांनी आधिक माहिती दिली.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार आणि हत्या प्रकरण; मुख्य आरोपीला शेगावातून अटक

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा / प्रतिनिधी :** कल्याणमधील अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करुन हत्या केल्याप्रकरणी मुख्य आरोपीला पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. मुख्य आरोपी विशाल गवळीला पोलिसांनी अटक केली आहे. शेगाव येथून पोलीस पथकाने आरोपीला ताब्यात घेतले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी विशाल गवळी पत्नीच्या गावी लपून बसला होता. पत्नीच्या गावातून शेगाव येथून पोलिसांनी त्याला ताब्यात घेतले आहे. कल्याण पूर्व येथील १३ वर्षीय मुलीच्या लैंगिक अत्याचाराच्या आणि हत्येच्या प्रकरणी पोलिसांनी तीन आरोपींना अटक केली आहे.

पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सीसीटीव्हीतून या गुन्ह्याची माहिती उघड झाली आहे. ही मुलगी दुकानात खाऊ घेण्यासाठी गेली होती. ती परत येत असताना विशालने तिला जबरदस्तीने उचलून रिक्षात कोंबले असल्याचे सीसीटीव्हीत दिसत आहे. मुख्य आरोपी विशाल गवळीने तीन लग्न केली होती आणि त्यावर अनेक गुन्हे आहेत.

सीसीटीव्ही फुटेजने गुन्ह्याचा खुलासा केला, ज्यात विशाल मुलीला जबरदस्तीने रिक्षात नेताना दिसतो. पोलिसांनी आरोपींची कसून चौकशी सुरू केली आहे आणि या प्रकरणाच्या खोलात जाऊन तपास करण्यात येणार आहे. अत्याचार प्रकरणात पोलिसांनी एकूण तीन जणांना अटक केली आहे. आज मुख्य संशयित आरोपी विशाल गवळीसह त्याच्या बायकोलाही शेगाव येथून पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.



## विविध वृत्त...


### मनुस्मृती दहन दिनानिमित्त काँग्रेसचे निषेध आंदोलन




दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी :** आज शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ गेट समोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्णाकृती पुतळ्यासमोर मनुस्मृती दहन दिवसाच्या निमित्त निषेध नोंदविण्यात आला. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी २५ डिसेंबर १९२७ ला औरंगाबादला मनुस्मृती दहनाचा कार्यक्रम केला होता त्याच अनुषंगाने काँग्रेसकडून मनुस्मृती विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.


### वाहतूक नियमांच्या जनजागृतीसाठी कल्याणात अवतरले सांताक्लॉज



दैनिक आपला विदर्भ

**कल्याण / प्रतिनिधी :** कल्याण वाहतूक पोलिसांनी वाहतुकीच्या नियमाचे महत्व पटवून देण्यासाठी अनोखी शक्कल लढवली आहे. कल्याण मध्ये नाताळ सणा निमित्त वाहतुकीच्या नियमांबाबत जनजागृती करण्यासाठी थेट सांताक्लॉजच अवतरले आहेत. हेल्मेट न घालणाऱ्यांना, सीटबेल्ट न लावणाऱ्यांना क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक करणाऱ्यांना वाहतूकीच्या नियमांची माहिती साक्षात सांताक्लॉजने दिली. वाहन चालकांनी वाहतुकीचे नियम पाळावेत, याकरिता कल्याण वाहतूक पोलिसांनी ही मोहीम राबवली आहे. यावेळी सांताक्लॉजने नियम मोडणाऱ्यांना चॉकलेट देत वाहतुकीच्या नियमांबाबत जनजागृती केली तर काही वाहन चालकांना दंड देखील ठोठावला आहे.

### ठाण्यात अटल बिहारी वाजपेयींच्या जन्मशताब्दी निमित्त अटल संध्या कार्यक्रमाचे आयोजन






दैनिक आपला विदर्भ

**ठाणे / प्रतिनिधी :** भारताचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या जन्मशताब्दी जयंतीनिमित्त भाजपा ठाणे शहराच्या वतीने 'अटल संध्या' या सुमधुर गीतांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. ठाणे शहर भाजप अध्यक्ष संजय वाघुळे यांच्या नेतृत्वाखाली हा खास कार्यक्रम ठाण्यातील भगवती मैदानाच्या पटांगणात संपन्न झाला. या कार्यक्रमात हिंदी चित्रपटांमधील सुमधुर गाणी सादर करण्यात आली. अटलबिहारी वाजपेयी यांच्या वैचारिक उंचीला आणि त्यांच्या देशसेवेला श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी ठाणेकर मोठ्या संख्येने उपस्थित होते. गीतांमधून अटलजींच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडण्यात आले. या प्रसंगी ठाण्यातील विविध मान्यवर, भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी उपस्थित राहून अटल बिहारी वाजपेयींना अभिवादन केले. त्याचबरोबर त्यांच्या काव्यरचनांचा उल्लेख करून त्यांच्या विचारधारेवर चर्चा करण्यात आली.

### शुभदा पाथरे यांच्या नृत्यअकादमीचा मीरा रोड येथे स्नेहसंमेलन सोहळा

**मुंबई / प्रतिनिधी :** शुभदा पाथरे यांच्या कला संस्कृती नृत्य अकादमीचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा रविवार २९ डिसेंबर रोजी पार पडणार आहे. दुपारी १२ ते ३ अशी या सोहळ्याची वेळ आहे. मीरा रोड येथील लता मंगेशकर सभागृहात हा सोहळा पार पडेल. पहिल्या कनकशक्ती पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेल्या सुमित्रा राजगुरु या सोहळ्याच्या प्रमुख पाहुण्या असतील. सुमित्रा राजगुरु यावेळी संस्कृती नृत्य अकादमीच्या विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन करणार आहेत.

या सोहळ्यात शुभदा पाथरे आणि त्यांचे विद्यार्थी स्वत: या सोहळ्यात शास्त्रीय नृत्य सादर करतील. त्याचप्रमाणे स्वर ओमानकुट्टन नायर, मृदंगम आर सत्त्क्यवर्धन आणि वायोलिन ई पी परामस्वरान हे साथ देणार आहेत. यानिमित्ताने प्रेक्षकांना शास्त्रीय नृत्याची पर्वणी अनुभवायला मिळणार आहे.



## माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी केले अभिवादन

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा / प्रतिनिधी :** भारताचे माजी पंतप्रधान भारतरत्न स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयी यांच्या जयंतीनिमित्त दिल्ली येथील समाधीस्थळावर जाऊन केंद्रीयमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले अभिवादन

भारताचे माजी पंतप्रधान स्वर्गीय श्रद्धेय अटल बिहारी वाजपेयी यांची २५ डिसेबरला जयंती साजरी केली जाते त्यानिमित्य एन डि ए च्यावतीने दिल्ली येथील सदैव अटल या समाधीस्थळावर आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं होतं सकाळीच केंद्रीय आयुष आरोग्य व कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी अटल बिहारी वाजपेयी यांच्या समाधी स्थळाला भेट देऊन पुष्प अर्पण करून भावपूर्ण आदरांजली वाहिली...

## मराठा क्रांती ठोक मोर्चा समन्वयक आबासाहेब पाटील यांनी देशमुख कुटुंबाची भेट घेते केले सांत्वन



दैनिक आपला विदर्भ

**बीड / प्रतिनिधी :** कोण आहे वाल्मीक कराड सरकार आणि संविधानापेक्षा मोठा आहे का? त्याला दोन दिवसात आत नाही टाकले तर पुन्हा आम्हाला आंदोलन करायला भाग पाडू नका. असा इशारा मराठा क्रांती ठोक मोर्चाचे समन्वयक आबासाहेब पाटील यांनी दिला आहे. आज आबासाहेब पाटील यांनी मयत संतोष देशमुख यांच्या कुटुंबाची भेट घेतली. महाराष्ट्र आणि बीड जिल्हा शांत ठेवायचा असेल तर सरकारला दोन दिवसाचा अल्टीमेटम आहे. दोन दिवसात सर्व आरोपी अटक करा. ३६ जिल्ह्यातील सर्व संघटना मराठा एकत्रित झालेले आहेत. आमचे सरकारला येवढेच म्हणणं आहे की फक्च एसपीची बदली करून चालणार नाही. पोलीस प्रशासनाला तोडगा काढावा लागेल कलेक्टर तहसीलदार हे रॅकेट आहे. महिन्याच्या आत मर्जीतील सगळे अधिकाऱ्यांच्या बदल्या करा अशी मागणीही मराठा क्रांती ठोक मोर्चा समन्वयक आबासाहेब पाटील यांनी केली आहे.

## अप्पर पोलीस अधीक्षक थोरात यांनी केले खामगाव शहर पोलीस ठाण्याचे वार्षिक निरीक्षण





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा / प्रतिनिधी :** खामगाव शहर पोलीस ठाण्याचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांनी खामगाव शहर पोलीस ठाण्याचे वार्षिक निरीक्षण केले. अशोक थोरात यांनी आतापर्यंत हिवरखेड पोलीस ठाणे, तामगाव पोलीस ठाणे मलकापूर एमआयडीसी पोलीस ठाणे, खामगाव शहर पोलीस ठाणेचे निरीक्षण पूर्ण केले आहे. खामगाव पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक रामकृष्ण पवार यांच्या नेतृत्वात खामगाव शहर पोलीस ठाण्याचे पोलीस पथकाने पोलीस कवायत मैदान खामगाव येथे अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात यांना गॉड ऑफ ऑनर दिला. यानंतर मैदानावरील पोलीस पथकाला सविस्तर माहिती दिल्यानंतर एक एस पी अशोक थोरात यांनी पोलीस ठाण्याच्या आवारातील स्वच्छतेची पाहणी केली. निरीक्षण केले पोलीस ठाण्यातील विविध गुन्ह्यांची माहिती घेतली पोलीस ठाण्यात नोंदवलेल्या विविध गुन्ह्यांचा आढावा घेतला आणि डायरी ठेवण्यासह आवश्यक मार्गदर्शन केले तसेच गुन्हे नियंत्रणासाठी पोलिसांची गस्त वाढविण्याच्या सूचना दिल्या आहेत.

## शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाई करणार, आगामी अधिवेशनात कायदा करणार : माणिकराव कोकाटे

**नाशिक / प्रतिनिधी :** शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांविरोधात कायदा करणार असल्याची घोषणा राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी नाशिकमध्ये केली. नव्या कायद्यात शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कठोर कारवाईची तरतूद करणार असल्याचं कोकाटे यांनी म्हटलं. शेतकऱ्यांच्या फसवणूक करणाऱ्यांविरोधात कोणत्या कायद्यान्वये कारवाई करायची याची अडचण असते त्यामुळं नवा आवश्यक असल्याचं माणिकराव कोकाटे यांनी म्हटल.

## सुशासन सप्ताहात ५३०१ लाभार्थ्यांना शासकीय सेवांचा लाभ

### ९१ शिबीरांचे आयोजन ; ५८९ तक्रार अर्ज निकाली





दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा / प्रतिनिधी :** केंद्रीय प्रशासकीय सुधारणा आणि सार्वजनिक तक्रारी विभागाच्या निर्देशानुसार जिल्हा प्रशासन मार्फत १९ ते २४ डिसेंबर दरम्यान 'सुशासन सप्ताह–प्रशासन गाँव की ओर' मोहीम राबविण्यात आली. या मोहिमेंतर्गत जिल्हा प्रशासनाच्या विविध विभागामार्फत ५,३०१ लाभार्थ्यांना विविध शासकीय सेवांचा लाभ देण्यात आला.

या मोहिमेला जनतेचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून या मोहिमेंतर्गत तालुकास्तरावर व गावस्तरावर एकूण ९१ शिबीरे आयोजित करण्यात आले होते. या मोहिमेत राज्य सरकारच्या आपले सरकार तक्रार पोर्टलवरील २४२ आणि शिबिरात प्राप्त ३४७ असे एकूण ५८९ तक्रार अर्ज निकाली काढण्यात आले.

या मोहिमेंतर्गत लाभार्थ्यांना विविध दाखल्यांचे वितरण करण्यात आले. यात जन्म–मृत्यू दाखला, जात दाखला, उत्पन्न दाखले, संजय गांधी निराधार योजनेचा लाभ इत्यादी लाभाचे वितरण करण्यात आले.


या मोहिमेत जिल्हा प्रशासनासह उपविभागीय कार्यालय, तहसिल कार्यालय, जिल्हा परिषद, विविध प्रशासकीय विभाग आणि ग्रामपंचायतींनी तालुका व गावस्तरावर शिबिरांचे आयोजन करुन पात्र लाभार्थ्यांना विविध शासकीय योजनांचे लाभ वितरित केले.

## संविधानाचा जयघोष करत बंधुता कारवाँने दिला बंधुभावाचा संदेश

### एमपीजेचा बंधुता अभियाना अंतर्गत उपक्रम

दैनिक आपला विदर्भ

**उमरखेड / तालुका प्रतिनिधी :** मूव्हमेंट फॉर पीस अँड जस्टिस (एमपीजे) ने आपल्या परंपरेनुसार राज्यस्तरीय संविधान सर्वासाठी बंधुता अभियानआयोजित केला आहे. नुकतेच मुंबईहून नांदेडमार्गे उमरखेड येथे बंधुता कारवा पोहोचला असून संविधानाचे महत्त्व आणि बंधुभावाची जाणीव करून देण्यासाठी शहरभर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.




एमपीजेने आयोजित केलेल्या या मोहिमेचा उद्देश संविधानाचे महत्त्व आणि बंधुभावाचा संदेश समाजात पोहोचवणे हा आहे. अभियाना अंतर्गत बंधुता कारवा पथकाने विविध ठिकाणी गीते, संगीत व नाट्य सादरीकरणाच्या माध्यमातून संविधानाचे महत्त्व आणि बंधुभावाच्या भावनेशी नागरिक व विद्यार्थी जोडले गेले. बंधुता कारवा चमुतील आमिर काझी ,प्रतीक्षा जया, ड .अनुराधा नारकर, प्रितेश कोसबे, संतोष गायकवाड, आशानारा गजभिये, सौरभ किंगराणी आणि इतर कलाकारांनी आपल्या संगीत ,पथ नाट्य , गितांच्या सादरीकरणाने कार्यक्रमाला चैतन्य दिले.

एमपीजेची ही मोहीम २६ नोव्हेंबर २०२४ ते २६ जानेवारी २०२५ या कालावधीत संपूर्ण महाराष्ट्रात विविध कार्यक्रमांद्वारे संविधानाचा आणि बंधुत्वाचा संदेश देत राहील. ते राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचेल आणि लोकांमध्ये संविधानाबद्दल आदर आणि एकतेची भावना जागृत करेल.

एमपीजेचा हा उपक्रम समाजाला एकत्र आणण्यासाठी आणि संविधानाविषयी जागरुकता वाढवण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरत आहे .